Rotary
SERVE TO CHANGE LIVES

R I District 3131
ROTARY CLUB OF PUNE SPORTS CITY

Bulletin 2021-2022

Sports Wheel

Year : 27th, Issue No.5
Date : January 2022

President : Rtn. Kiran Rao
kiranraorotary@gmail.com

Secretary : Rtn. Bhupinder Sethi
bksethi@yahoo.co.uk

Editor : Ann.Mona Savant
shree707@yahoo.com

Designer: Rtn.Alka Rode
alka.rode5@gmail.com

## PRESIDENTIAL MESSAGE



### HAPPY NEW YEAR!!

The vision can only be expressed by those who do no have the vision. Rotary Club of of Pune Sports City has done impactful projects which have helped the people and given them the
vison. Thanks to the members specially our dear Rotarian Dr. Pawar who has taken the initiative to lead the project.
Heartfelt thanks to our CSR partner Sai Service for the donation
towards one such project where more than 100 patients have been operated and given vison.
Keeping the tempo high the male Rotarians treated all the ladies with the Bawarchi night!!

# HAPPY NEW YEAR



"Service Above Self"



## EYE CHECKUP & CATARACT SURGERIES CSR PROJECT

**Rotary Pune Sports City's** regular **CSR** partner **Hodek Vibration Technologies Pvt Ltd** requested that eye checkup and cataract surgery camps be conducted in Sahajpur near their company facilities, using their CSR donation of **Rs. 240,000.**

**Rtn Tejesh Bagul** led this project with full support from our own **Dr. Rajesh Pawar** and his team at **Sane Guruji Arojya Kendra.** Sports City Rotarians contributed Rs. 15,000 towards the reading glasses beyond the Hodek budget.

The three camps at Sahajpur had 277 patients screened, 47 identified for cataract surgery, out of which 30 surgeries were done at Sane Guruji Arogya Kendra by

**Dr. Pawar** and his team. A total of 140 reading glasses were also distributed to the patients attending these camps at Sahajpur. Due to Covid restrictions, further camps could not be held at Sahajpur and Hodek agreed to Sports City's request that other cataract surgeries for needy patients could be conducted by **Janseva Foundation** at their camps and facilities. Another 38 cataract surgeries were done by Janseva Foundation, giving a total of 68 surgeries for this wonderful project. This much needed CSR eye checkup and cataract surgeries project benefitted over 300 patients, with the diagnostic checkup, reading glasses and cataract surgeries, thanks to **Hodek and Rotary Pune Sports City.**

**Rtn Tejesh Bagul**



Dr Pawar & Team prepare for surgery



Beneficiaries at Sahajpur Eye Camp



Eye checkup camp at Sahajpur



Doctors at the Eye Camp

Rtn Sandesh Savant, +91 98220 91102, sandeshsavant@rediffmail.com





**Bawarchi Night** म्हणजे पुरुष मंडळीयांनी कूकिंग करायचे व महिला मंडळींनी आरामात बसून जेवणाचा आनंद घ्यायचा, आहे की नाही गम्मत आणि मज्जा..!

या वर्षी आमच्या क्लबने साधारण १५वर्षांनी Bawarchi Night साजरी केली. या बाबद सहजच ही कल्पना आमचे क्लब मेंबर बिरेन धारमसी यांच्या मनात आली व त्यांनी सहज मला विचारले की आपण हा उपक्रम करूया..खरोखर हा उपक्रम किती उपक्रमी ठरला हे जसे जसे नियोजन सुरू झाले तसे तसे आमच्या लक्षात यायला लागले. सुरुवातीला आम्ही क्लब प्रेसिडेंट यांच्या कानावर ही कल्पना टाकली, त्यांनी पण उत्साह दाखविला व हा उपक्रम करू या असे शिक्कामोर्तब झाले. ही Bawarchi Night शनिवार दिनांक 12 मार्च 2022 माझ्या भुगाव येथील फार्म हाऊस ला करण्याचे ठरले करण उपलब्ध जागा व बरेच साहित्य तिकडे उपलब्द आहे.
आता खरी परीक्षा होती की क्लब मध्ये साधारण किती कूकिंग करणारी मंडळी आहे ही शोध घेण्याची. Whatsapp ग्रुपवर सर्वांच्या समोर Bawarchi Night चा प्रस्ताव प्रसारित केला. सुरुवातीला एक दोन वगळता कोणी पुढाकार घेतला नाही. काहींनी तर नको ही झंझट म्हणून काहीही प्रतिसाद दिला नाही, पण जसजसे पुरुष Bawarchi यांची नावे व पदार्थ यांची यादी सुरुवात झाली तसतसा इतर पुरुष मंडळी पुढाकार घ्यायला लागली व छोटा छोटा का होईना खारीचा वाटा उचलण्याची तयारी दर्शविली..आता आमचा पण आत्मविश्वास वाढला लगेचच एक वेगळा Whatsapp ग्रुप तयार करण्यात आला जेणेकरून आपापल्या क्षमतेनुसार व आवडीनुसार मेनू तयार करण्यात आला. ह्या उपक्रमास लागणारे साहित्य, किराणा, भाजीपाला, भांडी, गॅस व इतर सामानाची जुळवाजुळव सुरू झाली. ज्यांना कूकिंग येत नाही त्यांनी भाजी कापकुप करणे व इतर मदत करण्यास पुढाकार दर्शविला.

आता शनिवार दिवस उजाडला व सर्वांची लगबग सुरू झाली. पुरुषांनी दुपारी ४ ला स्वयंपाक सुरू करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे साहित्य व लागणारे सर्व गोष्टी घेऊन भुगाव ला पोहचले, कारण ७ वाजेला सर्व महिला येणार होत्या. साधारण मुख्य ६ कूक व 15 मदतनीस यांनी प्रचंड गोथळात कूकिंग ची सुरुवात केली. सर्व कूकिंग साधारण वेळेतच झाले. ठरल्या प्रमाणे महिला मंडळी ७ वाजेच्या दरम्यान यायला लागल्यात. तेथील नियोजनबद्ध कूकिंग बघून त्यांचा पण जीव भांड्यात पडला व आपण उपाशी राहणार नाही याची त्यांना खात्री पटली. आपला नवरा घरी साधा चहा पण करत नाही किंवा कामाला हातभार पण लावत नाही तो चक्क कूक करतांना किंवा मदत करतांना दिसत होता ते पाहून त्या अचंबित झाल्यात व आपापसात आपापल्या नवऱ्याचे गोड कौतुक व हळूच कौतुकाने व प्रेमाने टोमणे देत होत्या,.शेवटी सर्व खाद्य पदार्थ बाहेरील लॉन वर एखाद्या शाही समारंभात जेवणाची जशी मांडणी केली असते तशी करण्यात आली. त्याचा क्रम पण छान लावण्यात आला होता. साधारण नमकीन चाट, पाणीपुरी, रायता,बारबेक्यू, शाकाहारी व मौसाहरी भाज्या, चपाती, डाळ, भात व गाजर हलवा सारख्या स्वीट डिश पर्यंत १३ पदार्थ आम्ही सर्वांनी बनविलेले होते. सर्वांनी सर्व पदार्थ आवडीने खाल्लेत. महिला मंडळी तर आश्चर्यचकित झाल्या कारण की त्यांना एकही पदार्थास नावबोटे ठेवण्यास वावच मिळाला नाही. सर्वात शेवटी Bawarchi ड्रेस परिधान केलेले कूक मंडळींनी ग्रुप फोटो काढलेत व दरवर्षी असाच BawarchiNight उपक्रम करण्याचा निश्चय करण्यात आला. खूप खूप मज्जा आली व आभारप्रदर्शन कार्यक्रमानंतर उपक्रमाची सांगता करण्यात आली.

लेखक

रो. विनोद पाटील




SPORTS CITY GALS ENJOYING BAWARCHI NIGHT